# १४ ऑगस्ट २००३ पूर्वीच वार्षिक सर्वसाधारण सभा घ्या व स्वयंभू व्हा.

महाराष्ट्र सहकारी संस्था १९६० चा कलम ७५ नुसार. व आपल्या प्रत्येक संस्थेच्या उपविधीनुसार वार्षिक सर्वसाधारण सभा १४ ऑगस्ट पूर्वीच म्हणजेच १४ ऑगस्ट २००३ पूर्वीच घेणे आवश्यक, कायदेशीर व सर्वांच्या फायद्याचे आहे. मग मुदतवाढ कशासाठी ?

मी महाराष्ट्र राज्य सहकारी संघ जि. पुणे ह्या राज्य स्तरीय शिक्षण – प्रशिक्षण देणाऱ्या शिखर संस्थेचा अध्यक्ष पहिल्यांदा झालो व पहिले जे कर्तव्य केले की, कुठल्याही परिस्थितीत महाराष्ट्र राज्य सहकारी संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा १४ ऑगस्ट २००३ पूर्वीच घ्यायची असा निर्णय जाहीर केला व इच्छा व्यक्त केली. जी कारणे दाखवून मुदतवाढ घेतली जात होती, ती सर्व कारणे दूर केली, सर्व जिल्हा सहकारी बोर्ड, विभागीय मंडळाचे हिशोब बरोबर वेळेत प्राप्त झाले. कार्यालय कामाला लागले. नेत्यांनी, पदाधिकाऱ्यांनी,संचालकांनी,मनापासून साथ दिली.मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा ज्यावेळी अध्यक्ष झालो,तेथेही मी असेच केले. केवळ मला बारा महिन्यांच्या ऐवजी नऊ महिनेच अधयक्षपदाची धुरा वहाता आली, परंतु त्या तीन महिन्यांच्या कालावधीने माझे काहीही बिघडले किंवा बिघडत नाही. उलट प्रथम कायद्याचा मान राखून काम झाले, त्यात प्रचंड आनंद मिळाला. अधिकारी, कर्मचारी, सभासद व संचालक सुध्दा भारावून गेले व पुढील अडचणींतून आपोआप सुटका झाली.

नाहीतर वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी मुदतवाढ म्हणजे दिव्यच. कारणे तयार करा, ठराव करा, लाचारी पत्करा व एवढे करूनही आपल्यावर फार उपकार केले, हे पुन्हा त्यांचे ऐका व मुदतवाढ मंजुरीचे पत्र हतात मिळणेसाठी शेवटचे गोड कार्यक्रम त्यांचेबरोबर ( ?)कराच.

काय हा अजब प्रकार ? हे सर्व कशासाठी ? एवढा अपमान,व खर्च कशासाठी ? का म्हणून ? बदलत्या परिस्थितीत सहकारी मित्रांना ह्याद्वारे आवाहन करतो की, जे आपल्या हातात आहे व सहज विनामूल्य शक्य आहे, ते का करू नये ? एकेक संकट दूर करूया. सहकारी कार्यकर्ता चुकला, किंवा त्यास चूक करण्यास कोणी भाग पाडले तर येथून पुढे आपणच आपले प्रश्न सोडविण्यासाठी सज्ज राहायला पाहिजे. मधले दलाल प्रथम दूर करा. उपविधी व कायद्याचे पुस्तक वाचा, दलालांची गरज उरणारच नाही, किंवा आपला कोणी गैरफायदाही घेऊ शकत नाही.लाचार लोक केव्हाही नेतृत्त्व करू शकत नाही व त्या सहकार चळवळीत उपकारक ठरू शकत नाही. बेकायदेशीर, आघोरी, व जबरदस्तीच्या कृत्याचा जे कोणी लेखी पत्राने त्या त्या जागेवरून विरोध करीत नाहीत, बंड करीत नाहीत,अशा प्रवृत्ती व नेतृत्व समाज केव्हाच स्विकारत नाही, हा आजपर्यंतचा इतिहास आहे व भविष्यही तेच आहे.

सत्य कटूच असते असे नाही, ते गोडही असते. सहकारी संस्था कार्यकर्त्यांनी उभ्या केल्या, चालविल्या, त्यात अनेकजण यशस्वी होत आहेत. काहींना मार्ग सापडतो आहे, काही प्रयत्न करीत आहेत, म्हणजे त्या नैसर्गिक कृत्याचा गैरफायदा जर नेतृत्त्व उचलीत असेल तर पहिले ते करा—

१)  वार्षिक सभा १४ ऑगस्ट २००३ पूर्वीच घ्या.

२)  संस्थेचे लेखापरिक्षण करून घ्या.

३)  दोष दुरूस्ती अहवाल वेळेतच सादर करा व पोच घ्या.

४)  संस्थेचे ३० रू. सुध्दा सहज खर्चू नका – आव्हान द्या.

५)  आव्हान देण्यासाठी स्वत: कायदा वाचा.

६)  दुहेरी भूमिका स्विकारणाऱ्यांना जाब विचारा.

दगडाला सुध्दा पाझर फुटेल, ढिसूळ पायावर उभे राहिलेले प्रकल्प, संघटना व नेतृत्व पडद्याआड व घरी बसलेच म्हणून समजा.

न्याय मिळण्यासाठी व मिळवून देण्यासाठी सहकारात कष्ट करावे लागतात. संयम ठेवावा लागतो. प्रसंगी बंड करून संघर्ष करावा लागतो. परिणामाची पर्वा करायची नसते. सहकारी संस्था सभासदांच्या मालकीच्या आहेत ना? मग एवढा अन्याय का म्हणून सहन करायचा?

कार्यक्षेत्रातच सभासदत्व उपविधिप्रमाणे घ्यायचे, ठेवीचे नियम करून मान्यता घेऊनच ठेवी स्विकारायच्या, परतफेडीची क्षमता बघूनच कर्ज मंजूर करण्याचा निर्णय सभेतच घ्यायचा, कायदेशीर व ठरतेवेळी कागदपत्रे जमीनदार घ्यायचे. निधींचे/ठेवींचे कायद्याप्रमाणेच नियोजन करायचे व एवढे करूनही थकबाकी झाली तर एक मिनिटही कारवाई करण्यास कोणासाठीही थांबायचे नाही. एवढेच करण्याचा निश्चय पक्का करा. बघा काय होते ते? मागील चुका, अनियमितपणा व अज्ञान दूर करून आपल्याला सक्षम होता येईल.

राष्ट्रपिता माहात्मा गांधी, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले, स्व. वैकुंठबाई मेहता व सहकार महर्षी स्व. वसंतदादा पाटील ह्यांचे आदर्श जपण्यासाठी कच खाऊ नका. धैर्याने स्वाभिमानाने मार्ग काढा. सर्व आलबेल होऊ शकते. घटनेचे शिल्पकार प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मूलभूत मंत्र हाच होता – '' शिका –संघटीत व्हा व संघर्ष करा.''

मग आता ठरले. पहिला कार्यक्रम १४ ऑगस्ट २००३ पूर्वीच ह्या वेळी वार्षिक सर्वसाधारण सभा घ्यायची म्हणजे घ्यायची. व पुढील सर्व सोपस्कर वेळेत करायचे. यश तुमचेच आहे. व हेच सहकार चळवळीच्या भरभराटीचे इंगित आहे व स्वयंभूत्वाची प्रथम लक्षणे आहेत.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार!!!**